**PRESS MONITOR**

Publication : Sanjwarta
Edition : Pune
Date : January 12, 2017

---

**Headline:** HSIL air and water purifier brand Moonbow on an expansion mode

# मुनबो एअर अॅण्ड वॉटर प्युरिफायरच्या माध्यमातून एचएसआयएलची विस्ताराची योजना

पुणे : सॅनेटरी वेयर बाजारपेठेत ५५ वर्षांचा दैदिप्यमान वारसा असलेल्या एचएसआयएल लिमिटेड या कंपनीने विविध ग्राहककेंद्री उत्पादनांच्या माध्यमातून महाराष्ट्रात विस्तार केला आहे.हिंदवेअर ब्रॅण्डसाठी प्रसिद्ध असलेल्या या कंपनीने २०१५ च्या अखेरीस मूनबो या ब्रॅण्डच्या रुपाने वेगाने वाढणार्या एअर अॅण्ड वॉटर प्युरिफायर विभागात प्रवेश केला. ब्रॅण्डच्या एक्सेप्क्ट द अनएक्सपेक्टेड या तत्वानुसार चोखंदळ ग्राहकाच्या आरोग्यदायी जीवनशैलीसाठी मूनबो प्युरिफायर बाजारात दाखल करण्यात आले. भारततील सर्व सामाजिक-आर्थिक गटात स्वच्छ हवा आणि पाणी उपलब्ध व्हावे, हा यामागील हेतू आहे.

पुढील तीन वर्षात बाजार पेठेतील १२-१३ टक्के हिस्सा काबीज करण्याचा कंपनीचा ध्येय आहे.भारत भरात पसरलेल्या आपल्या संपर्क जाळ्याच्या माध्यमातून उपनगरे, छोटी शहरे आणि द्वितीय श्रेणीतील शहरांमधील बाजारपेठेत लक्षणीय विस्तार करण्याचे एचएसआयएलचे उद्दिष्ट आहे.

मूनबो एअर प्युरिफायर मध्ये प्युरी५ तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. या पाच पातळ्यांमध्ये चालणाऱ्या शुद्धीकरण प्रक्रियेत आसपासच्या हवेतील प्रदुषित घटक नष्ट करून हवा शुद्ध केली जाते. ट्रूहेपा फिल्टर्समुळे हवेतील ०.३ मायक्रॉन्स इतके अतिसुक्ष्म घटकही नष्ट होतात. शिवाय,अॅक्टिवेटेड चारकोल फिल्टर्समुळे दुषित वायू आणि दुर्गंधी शोषली जाते. या एअर प्युरिफायरमध्ये विविध आकाराच्या जागेसाठी पाच प्रकार उपलब्ध आहेत.

नुकताच बाजारात आलेला प्युरिफायर ब्रॅण्डच्या तंत्रज्ञानाच्या बांधिलकीचे प्रतिक आहे. यात बिल्ट-इन पीएम २.५ मीटर आणि एअर क्वॉलिटी इंडिकेटर आहे. यामुळे घरातील हवेच्या दर्जावर सतत लक्ष ठेवले जाऊ शकते. यात घरातील पीएम २.५ पातळी मोजली जाते आणि प्युरिफायरच्या डिजिटल डिस्प्ले मध्ये ते दाखवले जाते. प्युरिफायर सुरु केल्यानंतर आसपासच्या हवेतील प्रदुषणाची पातळी खालीखाली येत हवा कशी स्वच्छ होत जाते, याची आकडेवारी दिसू लागते. मूनबोमध्ये कार एअर प्युरिफायर ही उपलब्ध आहे. यात हेपाफिल्टरसह चार पातळ्यांवर चालणारी प्रक्रिया आहे. शिवाय, यातील ऑटो-ऑडर सेन्सरमुळे हवेतील प्रदुषित घटक आणि दुर्गंधी नष्ट होते. कार एअर-प्युरिफायरची किंमत ६९९० रु. तर रुम प्युरिफायरची किंमत १२९९० ते ३६९९० रु. आहे. ऑगस्ट २०१६ मध्ये बाजारात दाखल झालेल्या मूनबो वॉटर प्युरिफायरमध्ये पाच प्रकार उपलब्ध आहेत-ओशिनस प्रिमिअम, ओसिनस, ऑहिलस प्रिमिअम, ऑहिलस अॅण्ड ईजीली. हे वॉटर प्युरिफायर्स हेक्साप्युअर तंत्रज्ञान आणि स्मार्ट युझर इंटरफेस सह येतात. या वॉटर प्युरिफायरमुळे स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी पिण्याच्या पाण्याबरोबरच तुमच्या स्वयंपाक घराच्या सौंदर्यात भर घालणारा सुंदर व आकर्षक लुक ही मिळतो. या प्युरिफायरची किंमत १२९९०/- ते २६९९०/- या दरम्यान आहे.